KJ's Educational Institutes
TRINITY COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
LIBRARY DEPARTMENT
**NEWS PAPER CLIPPING**

**Date: 10th Dec 2018.** **Day –Monday** **Paper-Punyanagri** **Page No.9**

# इंटर्नशालामुळे विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास : जाधव

**पुणे : प्रतिनिधी**

अभियांत्रिकीमधील वाढत्या नोकरी-व्यवसायाच्या स्पर्धेमध्ये उतरणे आणि टिकून राहणे, हे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत औद्योगिक व व्यवहारिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना कौशल्याचे शिक्षण मिळणे क्रमप्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांतील कौशल्य वाढविण्याकरिता 'इंटर्नशाला' संस्थेने पुढाकार घेतला असून, ट्रिनिटी अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल, असे मत केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष कल्याण जाधव यांनी व्यक्त केले.

येवलेवाडी येथील केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूटच्या ट्रिनिटी महाविद्यालयात बदलते तंत्रज्ञान कौशल्य पुरविणाऱ्या 'इंटर्नशाला' या ऑनलाइन (वेब) इंटर्नशीप आणि प्रशिक्षण व्यासपीठाद्वारे आयोजित कार्यशाळेत जाधव बोलत होते. प्रसंगी संचालक डॉ. व्ही. जे. काखंडकी, कार्यकारी संचालक डॉ. एच. के अभ्यंकर, प्राचार्य डॉ. एच. जी. फाकटकर, मॅकेनिकल विभागाचे प्रमुख डॉ. बी. एम. शिंदे आणि प्राध्यापक एम. जे. घाडगे आदी उपस्थित होते.

ट्रिनिटी अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालयातील तालिब शेख या विद्यार्थ्याची 'इंटर्नशाला कॅम्पस अँबॅसेडर' म्हणून निवड झाली आहे. त्याबद्दल त्याचे कौतुक करण्यात आले. तालिब शेख याने 'इंटर्नशाला'विषयी माहिती दिली.

शेख म्हणाला, ''इंटर्नशीप आणि प्रशिक्षण देणारे भारतातील अव्वल क्रमांकाचे हे व्यासपीठ आहे. याद्वारे इंजिनिअरिंग, तसेच एमबीए मीडिया आणि इतर क्षेत्रांमध्ये पूर्णवेळ व अर्धवेळ इंटर्नशिपची संधी उपलब्ध आहे. प्रशिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना स्टायपंडही मिळतो. याचा लाभ घेतल्यास अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाच्या विविध वाटा खुल्या होतील, असे त्यांनी सांगितले.''